कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२४-२५/१०५४
दि. ०८/०८/ २०२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

## कला अकादमीची पुरुष कलाकार राज्यस्तरीय भजन स्पर्धा दि.१५ ऑगस्ट रोजी

भारताच्या स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून कला अकादमीतर्फे पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा गुरुवार दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजल्यापासून कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर कलामंदिरात निश्चित करण्यात आली असून यात विभागीय स्पर्धेतील चार केंद्रावरुन निवडण्यात आलेली एकूण आठ पथके सहभागी होणार आहेत.

**त्यात श्री दादामहाराज भजनी मंडळ, बांदिवडे-फोंडा, श्री ईश्वर सातेरी भजनी मंडळ, भोमा-फोंडा, श्री भगवती चिंबलकरीण भजनी मंडळ, चिंबल-तिसवाडी, श्री लक्ष्मी साखळयो भजनी मंडळ, रासई-सासष्टी, कला साधना संगीत संस्था, हणखणे, इब्रामपूर-पेडणे, श्री लक्ष्मीनारायण संगीत सांस्कृतिक संस्था, साळगांव-बार्देश, श्री सातेरी केळबाय कला आणि सांस्कृतिक मंडळ, लाडफे-डिचोली व श्री रवळनाथ भजनी मंडळ, न्हावेली-साखळी या पथकांचा समावेश आहे.**

राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकानी आपल्या सर्व सहकलाकारासह पुर्वतयारीनिशी १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता कला अकादमी, पणजी येथे उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सर्व पथकप्रमुखांच्या उपस्थितीत स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम चिठ्ठ्या टाकून ठरविला जाईल व तो सर्वावर बंधकारक राहील. त्यामुळे अंतिम स्पर्धेत सहभागी होणा-या आठही पथकांनी निर्धारित वेळेत उपस्थित राहाणे अनिवार्य आहे.

सदर स्पर्धेला जोडून सायं. ५.३० वा. विभागीय व राज्यस्तरीय बाल, महिला व पुरुष कलाकार भजन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार असून गोवा राज्याचे मा. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार असून कला व संस्कृती मंत्री व कला अकादमीचे अध्यक्ष श्री. गोविंद गावडे हे या समारंभाचे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत. सदर समारंभात विभागीय व राज्यस्तरावरील स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत.

सदर भजन स्पर्धा सर्वांसाठी खुली असून भजनप्रेमी रसिकांनी आपली उपस्थिती लावून स्पर्धेतील सादरीकरण करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता,

८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)